लोकमत पुणे, मंगळवार, दि. ३ मे २०१६

# मानवतेतून मंदिर-मशिदींची सुरक्षितता

## रामविलास वेदांती : तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर जागतिक शांतता पुरस्कार

पुणे : दहशतवाद, जातिधर्माच्या नावावरील हिंसाचार यांमुळे जगभरात अशांततेचे वातावरण आहे. त्यामुळे सर्व धर्मगुरू, इमाम, राष्ट्रांचे पंतप्रधान, मुख्यमंत्री व प्रमुख व्यक्ती यांनी पुढाकार घेऊन मानवतेच्या रक्षणासाठी प्रयत्न करायला हवेत. मानवतेच्या एकतेतून मंदिर-मशिदींची सुरक्षितता कायम राहून, समाजात शांती प्रस्थापित होईल, असे प्रतिपादन अयोध्या येथील रामजन्मभूमी शिलान्यासाचे कार्यकारी अध्यक्ष व माजी खासदार डॉ. रामविलास वेदांती यांनी केले.




पुरस्कार : विश्वशांती केंद्र आयोजित सोहळ्यात श्री एम. यांना प्रदान करताना रामविलास वेदांती, डॉ. विश्वनाथ कराड, डॉ. विजय भटकर, प्रा. मंगेश कराड व इतर.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेच्या वतीने दिला जाणारा 'तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर जागतिक शांतता पुरस्कार' मानव एकता मिशनचे अध्यक्ष महायोगी श्री एम. यांना डॉ. वेदांती हस्ते प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर अध्यक्षस्थानी होते. संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, जागतिक आरोग्य संघटनेचे सल्लागार डॉ. चंद्रकांत पांडव, प्रा. राहुल कराड, प्रा. प्रकाश जोशी, प्रा. डॉ. मंगेश कराड, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एस. एन. पठाण, डॉ. सुचित्रा कराड-नागरे आदी उपस्थित होते.

> श्री एम. यांनी 'वॉक ऑफ होप' अर्थात आशायात्रेच्या माध्यमातून भारतभर मानवता, विश्वशांती व एकतेचा संदेश दिला आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण जगाला शांततेचा संदेश देण्यासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा. 'सत्यम् शिवम् सुंदरम्' यानुसार सत्य हेच ईश्वर आणि सुंदर आहे. त्याचा स्वीकार करुन सर्वांनी एकत्रितपणे नांदायला हवे. तरच, समाजव्यवस्था अधिक बळकट होईल आणि एकोपा निर्माण होईल.
>
> **- डॉ. विजय भटकर, ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ**

डॉ. रामविलास वेदांती म्हणाले, ''श्री एम. अर्थात मधुकरनाथ यांच्यासारखा मार्ग इतरांनीही अवलंबला, तर रामजन्मभूमी-बाबरी मशीद असा वाद निर्माण होणार नाही. एवढेच नाही, तर बगदादीसारखे दहशतवादीही नष्ट होतील.''

श्री एम. ऊर्फ मधुकरनाथ म्हणाले, ''वॉक ऑफ होप' यात्रेदरम्यान आळंदी येथे अजान वृक्षाखाली संत ज्ञानेश्वरांच्या साक्षात्काराने भारावलो होतो. तीच भावना आजही आहे. आपण सारे चालते-फिरते मंदिर आहोत. प्रत्येकाच्या हृदयात ईश्वर वसलेला आहे. त्याची पूजा-आरती करुन नाही, तर सेवाभावाने साध्य होणार आहे. त्यासाठी आपण सगळ्यांनी मानववादी व्हायला हवे.''

डॉ. चंद्रकांत पांडव यांनी 'वॉक ऑफ होप' यात्रेविषयी माहिती दिली.

(प्रतिनिधी)